# शिक्षण उपसंचालक कार्यालय,पुणे विभाग,पुणे

१७ डॉ.आंबेडकर मार्ग, लाल देवळाजवळ, पुणे-४११००१

ई-मेल- 11thonlineadmissiondydpune@gmail.com वेबसाईट- WWW.dydepune.com


## इ. ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया-२०१७-१८ प्रसिद्धी निवेदन

**दिनांक :२४/०७/२०१७ .**

**(तिस-या फेरीसाठी सूचना)**

पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील इयत्ता ११वी सन २०१७-१८ ची ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सुरु आहे. केंद्रिय प्रवेश नियंत्रण समितीने जाहिर केलेल्या वेळापत्रकानुसार ऑनलाईन प्रवेश दुसरी गुणवत्ता यादी जाहीर होऊन दि.२१.०७.२०१७ ते २४.०७.२०१७ (रविवार वगळून) अखेर विद्यार्थ्यांनी ऑलेकेशन झालेल्या कनिष्ठ महाविद्यालयात ऑनलाईन प्रक्रियेद्वारे प्रवेश घेतलेले आहेत.

दिनांक २५.०७.२०१७ रोजी सायंकाळी ५.०० वाजता प्रवेशाच्या pune. 11thadmission.net या संकेतस्थळवर कॉलेज निहाय रिक्त जागांचा तपशिल जाहीर केला जाईल.

विद्यार्थ्यांनी आपले मेरिट मार्क्स व कॉलेज मधील रिक्त जागा व कॉलेजचा कटऑफ पाहून दिनांक २६.०७.२०१७ ते २७.०७.२०१७ अखेर सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत विद्यार्थ्यांना तिस-या फेरीसाठी पसंतीक्रम भाग-२ भरणे, पुर्वीच्या अर्जातील भाग-२ बदलणे, ज्या विद्यार्थ्यांनी अद्याप अर्जच केला नाही अशा विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्जाचा भाग-१ व भाग-२ भरणे यासाठी प्रवेशाचे संकेतस्थळ दि. २६.०७.२०१७ रोजी सकाळी ११.०० वाजता सुरु करण्यात येणार आहे. तिस-या गुणवत्ता यादीमध्ये प्रवेश घेण्यासाठी उपरोक्त विद्यार्थ्यांनी पुढील सूचनांप्रमाणे कार्यवाही करावी.

## १) पुर्वीच्या अर्जातील पसंती क्रम (भाग-२) बदलणेसाठी

- इ. ११ वी ऑनलाईन प्रवेशाच्या pune. 11thadmission.net या संकेतस्थळावर जावून विद्यार्थ्यांने (Student login) मध्ये जावून पुर्वीचाच लॉगइन आयडी व पासवर्ड टाकावा.
- (My Profile) हे पेज दिसेल.त्याखाली (My Status) मधील क्रमांक-४ च्या (Centralized Quota Choice Filling Status) समोरील (Filled / Edit Your Chioces) या वरच क्लिक करावे.
- महत्त्वाची सूचनाः-पसंतीक्रम भाग-२ बदल करण्यापुर्वी क्र-५ शेवटचा (Print Form) समोरील Print Registration Form Part-२) यावर चुकूनही विद्यार्थ्यांने क्लिक करु नये. यावर क्लिक केल्यास जो फॉर्म पहिल्या फेरीसाठी पसंतीक्रम होता तोच पसंतीक्रम लॉक होईल. व बदल करता येणार नाहीत अशा विद्यार्थ्यांना दुस-या फेरीसाठी कोणताही बदल करता येणार नाही. लॉक झालेला फॉर्म अंतीम समजण्यात येईल.
- त्यानंतर (Choices for Cerntalized) हे पेज दिसेल. आपले पुर्वीचेच पसंतीक्रम दिसतील. यापसंतीक्रमांचा क्रम बदलणे किंवा यापैकी काही काढून टाकणे किंवा काही नव्याने अॅड करणे या सर्व प्रकारचे बदल पुर्वी प्रमाणेच करता येतील. यासाठी त्यावर असणा-या आवश्यक त्या खुणांचा वापर करावा.
- आवश्यक तो बदल केल्यानंतर यापेजवरील उजव्या बाजुच्या (**Save**) या बटणावर न विसरता क्लिक करावे.
- (**Save**) या बटणावर क्लिक केल्यावर त्याच पेजवर वरील बाजुस आपण केलेले बदल आपणांस मान्य आहेत का? असे विचारले जाईल मान्य असल्यास (**OK**) या बटनावर क्लिक करावे. नसल्यास(**Cancel**) वर क्लिक करुन पुन्हा पसंतीक्रमात आवश्यक ते बदल करु शकतात.
- त्यानंतर (**ok**) बटनावर क्लिक करावे.
- आपला फॉर्म पुढील फेरीसाठी ऑनलाईन जमा होईल.

- जर आपणांस प्रिन्ट हवी असेल तरच (**Ok**) वर क्लिक केल्यानंतर (My Profile) हे पेज दिसेल. त्याखाली (My Status) मधील अ.क्र.५ शेवटचा (Print Form) समोरील (Print Registration Form Part-II) क्लिक करावे .

## २) भाग-१ पुर्ण असलेले परंतु भाग-२ अपुर्ण असलेले.

- अशा सर्व विद्यार्थ्यांनी जवळच्या मार्गदर्शन केंद्रावर जावुन आपला भाग-१ अॅप्रुव्हड करुन घ्यावा. त्याची प्रिन्ट घ्यावी.
- त्यानंतर (My Status) मधील क्र-३ (Registration Form Part-II) समोरील ( Part-II Registration) वर क्लिक करावे. ज्यानंतर इ.१०वी परीक्षेत विज्ञान विषयातील १०० पैकी मिळालेले गुण भरावे.
- त्यानंतर आपणांस हवी असणारी शाखा (Stream) क्लिक करावे. त्यानंतर माध्यम (Medium) निवडावे.
- शेवटी क्र.५ मध्ये चौकोनात क्लिक करुन (Confirm) बटन दाबावे. त्यानंतर (My Profile) हे पेज दिसेल. **सदर पेजवरील** क्रमांक-४ च्या (Centralized Quota Choice Filling Status) समोरील (Filled Your Chioces) या वरच क्लिक करावे. व त्यानंतर वर दिलेल्या सूचनांप्रमाणे कॉलेज पसंतीक्रम भरण्यात यावा. व यापेजवरील उजव्या बाजुच्या (**Save**) या बटणावर न विसरता क्लिक करावे.
- आपला फॉर्म पुढील फेरीसाठी ऑनलाईन जमा होईल.
- जर आपणांस प्रिन्ट हवी असेल तरच (**Ok**) वर क्लिक केल्यानंतर (My Profile) हे पेज दिसेल. त्याखाली (My Status) मधील अ.क्र.५ शेवटचा (Print Form) समोरील (Click Here To view/Print Registration Form Part-२) क्लिक करावे.

## ३) यापुर्वीच्या एकदाही ऑनलाईन फॉर्म न भरलेल्या विद्यार्थ्यांसाठी सूचना :-

- **माहिती पुस्तिकेतील लॉग-इन आयडी व पासवर्ड चा वापर करुन** इ. ११ वी ऑनलाईन प्रवेशाच्या pune. 11thadmission.net या संकेतस्थळावर जावून विद्यार्थ्यांने ( Student login) मध्ये जावून लॉगइन करावे.
- माहिती पुस्तिकेत दिलेल्या सूचनांप्रमाणे भाग-१ पुर्ण करावा.
- त्यानंतर मार्गदर्शन केंद्राकडुन आवश्यक ती कागदपत्र दाखवुन व तपासून मार्गदर्शन केंद्राच्या लॉग-इन मधून मान्य (अॅप्रुव्ह) करुन घ्यावा. व त्यानंतर भाग-१ ची प्रिन्ट घेवून त्यावर Pending Status नसल्याची खात्री करावी. जर भाग-१ वर Approved / Verified असेल तरच प्रवेश अर्जाचा भाग-२ भरता येईल. .
- त्यानंतर वरील क्रमांक-२ मधील सूचनांनुसार भाग-२ पसंतीक्रम भरून पुर्ण करावा.
- **महत्वाची सूचना :- यापूर्वी जर फॉर्म भरला असेल तर अशा विद्यार्थ्यांचे इ.१०वी परीक्षेचा सीट नंबर (Seat No) व वर्ष ब्लॉक (Block) करण्यात आलेला आहे. त्यामुळे फॉर्म भरलेल्या विद्यार्थ्यांनी नवीन माहिती पुस्तिका घेऊन नव्याने पुन्हा फॉर्म भरण्याचा प्रयत्न करु नये.**

**सदरचे परिपत्रक या कार्यालयाच्या** www.dydepune.com **व इ.११वी ऑनलाईन प्रवेशाच्या** http://pune.11thadmission.net **या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.**

**(दिनकर टेमकर)**
**अध्यक्ष**
**इ. 11 वी ऑनलाईन केंद्रिय प्रवेश नियंत्रण समिती,पुणे**
**तथा**
**शिक्षण उपसंचालक,**
**पुणे विभाग पुणे-१**

**Press note dt.24.7.17**